# पत्रलेखन

— नलिनी कापरे, कोथरुड, पुणे

जलबिंदू ल्यालेलं फुलपाखरू पाहिलं, अन् सहजोद्गार मनी उमटला, "व्वा! हे तर देवानं पाठवलेलं पत्र! आनंदात रहा. सौंदर्यक्षण, मधुकण वेचित जगा." हा संदेश देणारं!

खरं तर क्षणाक्षणाला निसर्गराजा, पंचमहाभूते, संदेश देत असतात. ती दृश्यालिपी अवगत मात्र आपल्याला करावी लागते. खडकावरचं इवलंसं रोपटं विजिगिषु वृत्तीचा संदेश देतं. प्रतिकुल परिस्थितीत धीर न सोडता आपली प्रगती आपणच साधली पाहिजे. दुसऱ्यांसमोर रडगाणं न गाता! फुलवणं, फळवणं देवाजीच्या हाती, पण आपण कसलीच अपेक्षा न धरता निसर्गदेवतेशी सावयव तादात्म्य पावण्याचा स्वधर्म तर पाळायलाच हवा. त्यातूनच तर स्वानंदाबरोबर आत्मारामालाही संदेशपालनाचे समाधान आपण देतो. त्याच्याही पत्रलेखनाचे त्याला साधार कृतीयुक्त उत्तर मिळते.

झाड फुलणं असो की पानगळ असो, सुकलेल्या पानातलंही सौंदर्य, त्यातली औषधी गुणतत्व नष्ट होत नाहीत. कोंबापासून ते निष्पर्ण होण्याचा जीवनप्रवास हे तर मोठ्ठं पत्रलेखन आहे जगन्नियंत्या

प्राणीजीवन मानवीजीवन, क्षुद्र कीटकजीवन, पक्षीजीवन, जलचरजीवन हे सारं सारं...... विधाता त्याच्या, विस्तीर्ण नभपत्र, भूपत्र, वायुपत्र, जलपत्रावर रेखित करतो. तीच त्याची चित्रलिपी! चित्रगुप्ताचे हेच ते गुप्तलेखन! हेच ते पत्रलेखन चराचराला पाठवलेल

कधी तो पाऊसधारांची उद्‌गारचिन्हे, सौदामिनीची अवतरणचिन्हे, विविध ऋतुरंगांचे स्वल्पविराम, अचानक चक्रीवादळ, अवकाळी पाऊस, गारपीट, भूकंप, पूर, भूस्खलनाची प्रश्नचिन्हेही वापरतो बरं! भूकंपरूपी आडव्या उभ्या रेघारेघांतून विसर्ग आणि अर्धविरामांनाही

Teacher's Signature ..................

DATE : ६ । ४ । २३
PAGE NO. :

स्थान असतं त्याच्या पत्रलेखनी ! आणि प्रत्येक जीवाच्या आत्म्यात पूर्णविराम तर सर्वज्ञातच आहे.

आपली अक्षरलिपी कागदावरच नष्ट होणारी. कोरीव लिपी कालौघात नष्ट होणारी ! खरं तर क्षर-लिपीच !

पण ब्रह्मांडशक्तीची लिपीच खऱ्याअर्थाने अ-क्षर ! अक्षय !! बरं त्याचे पोस्टमन कोण तर सूर्य, चंद्र, तारे, उन्हे, चांदणे, सुरभित वारे, सुसाट वारे, खळखळणारे प्रपात, झरे, नद्या, सागरे, डोंगरकडे पर्वत, हिमनग, खडक, ग्रहणे, माती, शेती, पिके ! या पोस्टमनांची वर्दी एकसारखी, एकरंगी नाही पण जीव, शिव तत्व एकच !

आपणही या साऱ्या पोस्टमनांची रोज वाट पहातो. देवाने पाठवलेले पत्रही स्वीकारतो. पण ..... त्यातला मजकूर वाचून, समजून घेतोच असे नाही ना ! अपवाद आहेत काही त्याला, काहीजण तो मजकूर वाचतात. देवलिपी त्यांना लगेच कळते. अवगत होते. ते वाचतात, अंमलात आणतात तो मजकूर ! त्यांचेच जगणे कृतार्थ होते. मजकूर न वाचणारे अंतकाळी पस्तावतात. आयुष्य थोडेच उरले असतांना त्यांना पत्रातला मजकूर थोडा थोडा कळायला लागतो, पण अंमलात आणायला वेळ, शक्ती नसते. 'अरेरे ! हे सारे देवाने दिलेल्या आयुष्यपत्राचे मी वाचन करायला हवे होते.' ही पश्चातबुध्दी त्यांचा जीवनान्त दुःखद करते.

पण शुभकार्य केंव्हाही चालू करता येते. त्याचे सुफळ मिळतेच ! उशीरा सुचलेले शहाणपणही फळा येतेच ! चला तर मग आपण सारे सृष्टीगीत गाऊन, त्याचे देवत्वरूप ओळखून सकारात्मकता, प्रेम, सत्कार्याने त्याच्या पत्राला उत्तर देऊ या ! आनंद वर्धनाचे रोप लावू या !

— नलिनी कापरे, पुणे 9594132887

Teacher's Signature ..................